महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक — संकीर्ण/सीआर- ०१/२०२१ दहा                                        दिनांक : १२ जुलै, २०२१

# प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होऊनही नोकरी मिळत नसल्याचा ताणतणाव व आर्थिक ओढाताण यामुळे श्री. स्वप्निल सुनील लोणकर या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची दु:खद घटना पुणे येथे घडली आहे.

२. सन - २०२० मध्ये संपूर्ण भारतात पसरलेल्या कोरोनाच्या साथीला अटकाव करण्यासाठी मार्च, २०२० मध्ये संपूर्ण देशात लॉकडाऊन लागू करण्यात आला. कोविडजन्य परिस्थिती तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने झालेल्या परीक्षांचे निकाल लावण्यात आले नव्हते. तसेच काही निकाल सुधारित करणे आवश्यक झाले आहे. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचे आरक्षणाच्या अनुषंगाने विविध परीक्षांसंबंधात करावयाच्या कार्यवाहीबाबत शासनाकडून सुधारित अभिप्राय मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने शासनाकडून त्यासंबधात दिनांक ५ जुलै,२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला असून त्यानुसार पुढील कार्यवाही प्राथम्यक्रमाने करण्यात येत आहे.

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग